## प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलढाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोसे क्र.१ श्री.संतोष महादेव वानेरे, वय ५० वर्ष, व्यवसाय–नोकरी, पद–आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, बुलढाणा आगार, वर्ग–२, ह.मु. शासकिय निवासस्थान रा.प.महामंडळ, बस स्थानकजवळ धाड रोड, बुलढाणा ता.जि. बुलढाणा, रा.माळीखेल जामोद, ता. जळगाव जामोद जि.बुलडाणा<br>आलोसे क्र.२ श्री.महादेव दगडू सावरकर, वय ४३ वर्ष, व्यवसाय– नोकरी, पद–वाहक, राज्य परिवहन महामंडळ, बुलढाणा आगार, वर्ग–३ रा.शास्त्री नगर, माळविहीर, बुलढाणा ता. जि.बुलढाणा. |
| लाच मागणी | ७,०००/– रुपये |
| लाच स्विकारले | ७,०००/– रुपये |
| घटनास्थळ | बुलढाणा खामगाव रोड वरील संत तुकाराम पतसंस्था समोर |
| घटना तारीख | दि.२२.०८.२०२३ |

थोडक्यात हकीकत :– यातील तक्रारदार यांनी दिनांक २१.०८.२०२३ रोजी लाप्रवि बुलढाणा घटकाकडे तक्रार दिली की, यातील आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार व त्यांचे सहकारी हे पंढरपूर येथे यात्रे करीता डयुटीवर गेले असतांना त्यांनी बसमध्ये स्टोव्ह पेटवून त्यावर स्वयंपाक केल्याबाबतचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. सदर व्हायरल व्हिडीओचा अहवाल वरीष्ठांकडे न पाठविण्याकरीता आरोपी क्र.१ यांनी सुरुवातीस ४०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन आलोसे क्र. २ यांचे मार्फतीने ३५,०००/– रुपये लाच मागणी करुन २८,०००/– रुपये यापुर्वी स्विकारले. आलोसे क्र. २ हे ऊर्वरीत ७,०००/– रुपये लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार प्राप्त झाली.

कारवाई दरम्यान लोकसेवक श्री.महादेव सावरकर यांनी पंचासमक्ष तक्रारदार श्री. प्रदीप सरकटे यांना ७,०००/– रुपये लाचेची मागणी केली. आणि आलोसे क्र.०१ श्री.वानेरे यांनी त्यास प्रोस्ताहान दिल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यावरुन दिनांक २१.०८.२०२३ रोजी आयोजीत सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. महादेव सावरकर यांना तक्रारदार यांचेकडून पंच क्र. १ यांचेसमक्ष ७,०००/– रुपये स्वीकारतांना रंगेहात पकडण्यात आले. त्यावरुन आलोसे क्र.१ श्री.संतोष महादेव वानेरे, आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, बुलढाणा आगार, आलोसे क्र.२ श्री.महादेव दगडू सावरकर, वाहक, राज्य परिवहन महामंडळ, बुलढाणा आगार,वर्ग–३ रा.शास्त्री नगर, माळविहीर, बुलढाणा ता.जि.बुलढाणा.यांचे विरुध्द पोलीस स्टेशन बुलढाणा शहर येथे अप.नं. ७३४/२०२३ कलम ७(अ), १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मार्गदर्शन :– १. मा. श्री. मारुती जगताप, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

२. मा. श्री. देविदास घेवारे, अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

कार्यवाही पथक – श्रीमती शितल घोगरे, पोलीस उपअधिक्षक, लाप्रवि. बुलढाणा

श्री.सचिन इंगळे, पोलीस निरीक्षक,अॅन्टी करप्शन ब्यरो बुलढाणा, पोहेकॉ मोहम्मद रिजवान, राजु क्षिरसागर, प्रविण बैरागी, पोना विनोद लोखंडे, जगदीश पवार,, रविंद्र दळवी, सुनिल राऊत, पोकॉ गजानन गाल्डे, मपोकॉ. स्वाती वाणी, चापोकॉ. अरशद शेख यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्यरो बुलढाणा कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ व ९६५७०६६४५५ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा यांनी केले आहे.

पोलीस उप अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो ★ बुलढाणा ★ सत्यमेव जयते

( श्रीमती शितल घोगरे )
पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्यरो, बुलढाणा

Scanned with CamScanner